MAHA HOUSING CORPORATION

# महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ

**(महाराष्ट्र शासन अंगीकृत)**

**३ रा मजला, साखर भवन, रामनाथ गोयंका मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०००२१.**

**दूरध्वनी क्र.: ०२२-४०४४ १०००; ईमेल : mhdc.mahahousing@maharashtra.gov.in**

महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळातर्फे सोलापूर, नागपूर, बारामती येथे गृहनिर्माण प्रकल्प राबविण्याचे कामकाज सुरु झाले आहे. तसेच महाराष्ट्रात विविध ठिकाणी गृहनिर्माण प्रकल्प राबविण्याचे कामकाज महामंडळामार्फत सुरु आहे. सदरील गृहनिर्माण प्रकल्पाच्या कामकाजासाठी साईट वर कनिष्ठ अभियंता यांची गरज असल्याने सदरील पद हे करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यांकरिता भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून दि.२७.०५.२०२२ पर्यंत उपरोक्त नमूद पत्त्यावर प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतींसह अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अनु क्र. | पदाचे नाव |
|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) |
| २ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) |

**१. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदासाठी पात्रता निकष -**

१. महाराष्ट्र शासन मान्य विद्यापीठातील स्थापत्य शाखेतील पदविका (Diploma / BE - Civil Engineering / B. Tech) धारण केलेली असावी.
२. तसेच, शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/सरकारी उपक्रमे अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित कंपनी/ फर्म इ.. कार्यालयातील ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा कामाचा अनुभव असावा.
३. गृहनिर्माण व नागरी बांधकाम क्षेत्रातील विशेषत: Mivan बांधकाम तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावरील (Site) किमान ०५ वर्षाचा अनुभव.
४. तसेच विशेषत: अंदाजपत्रक तयार करणे, दर विश्लेषण करणे, सर्वेक्षण करणे, बांधकाम पर्यवेक्षण, निविदा दस्तऐवज तयार करणे इ.. बाबतचा अनुभव असणे आवश्यक आहे.
५. AUTOCAD चे ज्ञान असणे आवश्यक आहे.
६. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.

**२. कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदासाठी पात्रता निकष -**

१. महाराष्ट्र शासन मान्य विद्यापीठातील स्थापत्य शाखेतील पदविका (Diploma / BE - Electrical Engineering) धारण केलेली असावी.
२. तसेच, शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/सरकारी उपक्रमे अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित कंपनी/ फर्म इ.. कार्यालयातील ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा कामाचा अनुभव असावा.
३. विस्तृत इलेक्ट्रिकल बिल्डींग सेवा, अभियांत्रिकी डिझाइन आणि विश्लेषण मध्ये किमान ५ वर्षाचा अनुभव.
४. AUTOCAD चे ज्ञान असणे आवश्यक आहे.
५. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.

**टिप:**

१. उपरोक्त पदासाठी पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची मुलाखतींद्वारे निवड करण्यात येईल.
२. योग्य उमेदवार प्राप्त झाल्यास प्रत्येक पदासाठी (१:३) प्रमाणात निवडसूची तयार करण्याचे अधिकार महामंडळास राहतील. उपरोक्त निवडसूची ११ महिन्यांकरिता किंवा महामंडळ ठरवील त्या कालावधीसाठी ग्राह्य राहील.
३. उमेदवाराची गुणवत्ता व पदासाठीचा अनुभव विचारात घेऊन त्याचे दरमहा ठोक पारिश्रमिक निश्चित करण्याचे तसेच कमी/जास्त करण्याचे अधिकार महामंडळास राहतील.
४. उपरोक्त पदांवरील भरती ही महामंडळाद्वारे वेळोवेळी ठरविलेल्या शर्ती व अटींच्या अधीन राहील, तसेच उपरोक्त पदांचा कालावधी कमी/अधिक करण्याचा अधिकार महामंडळास राहील.

**सही/-**
**(शंकर भिसे)**
**व्यवस्थापकीय संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**

# अर्जाचा विहित नमुना

**प्रति,**
**मा. व्यवस्थापकीय संचालक,**
**महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ,**
**३ रा मजला, गृहनिर्माण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

विषय : ---------------------------------------- या पदासाठी अर्ज.
संदर्भ : ---------------------------------------- या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेली जाहिरात.

| अ.क्र. | अर्जदाराची माहिती | | सविस्तर तपशील |
|---|---|---|---|
| १. | अर्जदाराचे संपूर्ण नाव | : | |
| २. | जन्मतारीख | : | |
| ३. | पत्र व्यवहारासाठीचा पत्ता | : | |
| ४. | अर्जदाराचा दूरध्वनी/ भ्रमणध्वनी क्रमांक | : | |
| ५. | ई-मेल आयडी (Email ID) | : | |
| ६. | शैक्षणिक अर्हता | : | |

| अ. क्र. | अभ्यासक्रम | संबंधित विद्यालयाचे/महाविद्यालयाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | एस.एस.सी. (१० वी) | | | |
| २. | एच.एस.सी. (१२ वी) | | | |
| ३. | पदवी | | | |
| ४. | पदव्युत्तर | | | |
| ५. | विशेष प्राविण्य | | | |
| | | | | |
| | | | | |

| अ.क्र. | अर्जदाराची माहिती | | सविस्तर तपशील |
|---|---|---|---|
| ७. | सेवेतील कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात) प्रमाणपत्रासह | : | |

| अ.क्र | कार्यालयाचे नाव | कार्यालयातील पद | कालावधी | प्राप्त होत असलेला वार्षिक पगार (रु.) |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | सेवेतील एकूण अनुभव | : | |
| ८. | संगणकाचे ज्ञान / एमएससीआयटी प्रमाणपत्र | : | |
| ९. | सेवानिवृत्त झाले असल्यास सेवानिवृत्तीचा दिनांक | : | |

**टीप : शैक्षणिक अर्हता, अनुभव, संगणक याबाबतच्या प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रती सोबत जोडणे आवश्यक आहे.**

स्थळ :

दिनांक :

मी अशी प्रतिज्ञा करतो/ करते की, मी अर्जात नमूद केलेली माहिती व दिलेला तपशील सत्य व अचूक आहे. यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पूर्वसूचनेशिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेल याची मला पूर्ण जाणीव आहे.

**सही**

**(अर्जदाराचे नाव)**